दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

प्रामाणिक पणानेच जीवनात यश मिळते.

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २ जून २०२५ | अंक १७० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# ब्राह्मण समाजाची संख्या बोटावर मोजण्या इतकी पण

## ब्राह्मण समाजाचं काम दुधात साखरेचं, चिमूटभर साखर टाकली तरी गोडवा तयार करण्याचं काम

संपूर्ण इतिहासात कोणतेही क्षेत्र काढून बघा, त्यात चित्तपावन समाजाची लोकं दिसतात स्वातंत्र्य चळवळ, कला आणि साहित्य क्षेत्र बघा त्यातील 10 नावं काढले तर त्यात 3-4 नावं चित्तपावन समाजाची असतात. राजकीय क्षेत्रात संख्या महत्त्वाची असते, ब्रह्मण

### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

चित्तपावन ब्राह्मण संघाचे अभिनंदन, अतिशय सुंदर भवन उभारलं आहे, त्याच्या उद्घाटनाची संधी मला दिली त्याबद्दल आभार, हॉस्टेलसुद्धा उभारले आहे. अमृत स्नानाच्या तारखांची आज घोषणा करायची होती, त्यासाठी आलो होतो. 93 वर्षे सातत्यानं ही संघटना काम करत आहे. 1933 ला जी सभा झाली होती, त्याचे सुद्धा इतिवृत्त इथं वाचायला मिळालं. गरजू लोकांना मदत करता आली पाहिजे, संपूर्ण इतिहासात कोणतेही क्षेत्र काढून बघा, त्यात चित्तपावन समाजाची लोकं दिसतात. स्वातंत्र्य चळवळ, कला आणि साहित्य क्षेत्र बघा त्यातील 10 नावे काढले तर त्यात 3-4 नावं चित्तपावन समाजाची आहेत, गरीब घरातून पुढे आलेली ही लोकं आहेत, असं यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे.

बोटावर मोजण्या इतके, पण ब्राह्मण समाजाचं काम दुधात साखरेसारखं असतं' असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज नाशिकमध्ये परशुराम भवनचं उद्घाटन झालं, या कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. चित्तपावन ब्राह्मण संघटनेच्या वतीनं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पुढे बोलताना ते म्हणाले की, जातीय व्यवस्था असू नये असे वाटते, पण जात कधीच जात नाही. जातीय विषमता नसावी असे वाटते, राजकीय क्षेत्रात संख्या महत्त्वाची असते. ब्राह्मण समाजाची संख्या बोटावर मोजण्या इतकी पण ब्राह्मण समाजाचं काम दुधात साखरेचं, चिमूटभर साखर टाकली तरी गोडवा तयार करण्याचं काम, आपले ऐतिहासिक योगदान राहिले आहे, ते यापुढे राहील. आपल्या मुलांवर तसे संस्कार करावे,

# पाटोदा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्नविद्यार्थी व पालकांचा उस्फुर्त प्रतिसाद

पाटोदा ( प्रतिनिधी) पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पाटोदा तालुक्यातील दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन करणाऱ्या तब्बल ५१ विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह सत्कार करण्यात आला पाटोदा रेणुका माता मंदिर येथील सभा मंडप येथे दिनांक 30 मे शुक्रवार रोजी सकाळी 11 वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक विद्यालयाचे प्राचार्य तुकाराम तुपे सर होते तर प्रमुख पाहूणे म्हणून उपविभागीय अधिकारी शेख वसिमा (मॅडम) नायब तहसीलदार सय्यद मुल्ला साहेब, पोलीस उपनिरीक्षक भडके प्राचार्य नजीर पठाण, जेष्ठ पत्रकार छगन मुळे, राहुल शाहुराव जाधव, सय्यद शहाबाज, जेष्ठ सेवा निवृत्त शिक्षक दे.मा.जावळे, प्राचार्य राजेंद्र आविळे आधी उपस्थित होते. तालुक्यातील जवळपास १५ विद्यालयाचे एकूण प्रत्येकी तीन प्रमाणे जवळपास ५१ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ तसेच प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊळ गौरविण्यात आले आहे. विशेष म्हणजे यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी शेख नसिमा यांनी सांगितले की यशस्वी विद्यार्थी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनाची तर चिकाटी पाळली पाहिजे जीवनातले आपले उद्देश ठेवा मात्र यामध्ये जर साध्य झाल्या जिद्दीने आणि अभ्यासातील




चिकाटी तुम्हाला जरूर यशस्वी केल्या शिवाय रहाणार नाही.आपण आपल्या इच्छित स्थळी पोचू शकतो सोबतच त्यांनी या संदर्भात अनेक यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे दिले यावेळी प्राचार्य तुकाराम तुपे यांचीही अध्यक्षस्थानी होते अध्यक्षीय भाषणात बोलताना तुकाराम तुपे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांवर पालकांनी सतत लक्ष ठेवण्याची अत्यंत आज काळाची गरज असल्याचे सांगून विद्यार्थी सुद्धा आपल्याला योग्य ठिकाणी जाण्यासाठी मेहनत व चिकाटी आणि ठेवण्यास आपले उद्दिष्ट साध्य करू शकतो असे सांगितले यांनी आपल्या आपल्या मार्गदर्शनपर भाषण घेऊ कार्यक्रमा यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे जेष्ठ पत्रकार छगन मुळे, तालुका अध्यक्ष अजय जोशी जिल्हा उपाध्यक्ष कादर मकरानी ,संजय सानप, हमीदखान पठाण,जावेद शेख, अनिल गायकवाड ,पवन भोकरे, सचिन शिंदे, सय्यद फय्याज, सतिश गर्जे,सय्यद साजिद, दत्ता देशमाने, दिगंबर नाईकनवरे, कार्यक्रमासाठी कार्यक्रमाची

प्रस्ताविक प्रा. सचिन पवार यांनी केले सूत्रसंचालन कादर मकरानी तर आभार हमीदखान पठाण यांनी मानले,

# बीडमध्ये पाच ते सहा जणांच्या टोळक्याकडून तरुणावर चाकूने वार

बीड दि. ३१ (प्रतिनिधी):-

जिल्ह्यातीलगुन्हेगारी कमी करण्याचे प्रयत्न बीड पोलीस अधीक्षक नवनीत काँवत करत आहेत परंतु गुन्हेगारी कमी होताना दिसत नाही. काही दिवसापासून मारहाणीचे नवनवीन व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. काल रात्री १०:३० वाजता पेठ बीड पोलीस ठाण्याच्या जवळ शंभू चव्हाण (वय २१ वर्ष रा. बार्शी नाका ढगे कॉलनी



बीड) या तरुणाला पाच ते सहा जनाच्या टोळक्याने जबर मारहाण करत चाकूने वार केले असून त्याला उपचारासाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शंभू चव्हाण ही आपल्या मित्राला भेटण्यासाठी नाळवंडी नाकाकडे जात असताना अज्ञात टोळक्याने अडवून मारहाण केली. पेठ बीड पोलीस ठाण्यापासून १०० मीटरवर मुख्य रस्त्यावर मारहाण करत अज्ञाताने चाकूने तोंडावर केले आहेत. यात चव्हाण यांच्या डोळ्याला देखील दुखापत झाली आहे.

# आदर्श देवगाव येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक व ग्रामपंचायत कार्यालय मध्ये जयंती उत्सहात साजरी...

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशत्बादी जयंती उत्सहात साजरी करण्यात आली आहे... राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मंदिर जीर्णोद्धार, शेतकऱ्यांसाठी करमाफी, शाळांच्या स्थापनेद्वारे विद्याप्रसार तसेच अंधश्रद्धा निवारण अश्या अनेक समाजोद्धाराची कार्ये केल्या. दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम अहिल्याबाईंची धर्मनिष्ठा, पराक्रम, प्रशासनकौशल्य यांमुळे भारताच्या इतिहासात त्यांचे नाव




सुवर्णाक्षरात लिहिले गेले. त्यांची प्रजा सुखी-समाधानी राहील यासाठी त्या अविरत झटत राहिल्या.संपूर्ण देशभरात यावनी पातशाह्यांनी विध्वंस केलेल्या अनेक मंदिरांचा राजमाता अहिल्याबाईंनी जीर्णोद्धार केला. अशा 'धर्मपरायण, न्यायनिष्ठ, दानशूर व अतिशय कर्तृत्ववान राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर . एक अतिशय दानशूर कर्तृत्ववान राज्यकर्त्या म्हणून अहिल्यादेवी होळकर यांचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णक्षण लिहिले गेलेले आहे . त्यांचे नेतृत्व व न्यायप्रियता आणि समाजासाठी केलेली कार्य आजही प्रेरणादायी ठरतात अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य केवळ प्रेरणादायीच नाही तर ते एक आदर्श राज्यकर्तेचे प्रतीक आहे. त्यांच्यामध्ये राजमाता जिजाऊ नंतर पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय स्थान असून धार्मिक सामाजिक आणि राजकीय कर्तृत्वाने भारतभर त्यांनी मोठी किर्ती आणि नवलौकिक मिळवले. संपूर्ण भारतभर मंदिरे बांधणे मंदिराचा जीर्णोद्धार नद्यावर घाट बांधणे पिण्याच्या पाण्यासाठी विहीरी खोदणे. धर्मशाळा बांधणे अन्नछत्र चालवणे आधी लोक कल्याणकारी कार्याच्या खुणा आजही भारतभर दिसून येतात. आज आदर्श देवगाव या ठिकाणी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक व ग्रामपचांयत कार्यालय येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यांदेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना उपस्थित गावचे सरपंच उपसरपंच .ग्रामपंचायत सदस्य विविध क्षेत्रातील कार्यरत असणारे व्यक्ती, गावातील नागरिक युवक उपस्थित होते, व मोठ्या उत्साहात व जल्लोषात जयंती साजरी करण्यात आली...

# सोमुर येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : सोमुर येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांची तीनशे वी जयंती अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली सतिप्रत्येसारखे प्रथांना पायदळी तुडवुन पती मरण पावल्यानंतर घोड्यावर बसुन हातात तलवार घेऊन राज्यकारभार करणार्या अशा मुत्सद्दी शुरवीर अशा अहिल्याबाई होळकर यांचे कार्य होते असे प्रतिपादन यावेळी संभाजी ब्रिगेड चे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांनी केले.


सोमुर फाटा येथील अहिल्याबाई होळकर चौकात हा कार्यक्रम घेण्यात



आला यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील,पृथ्वीराज पाटील,ज्ञानेश्वर देवकत्ते,राहुल पांढरे,विष्णू बिरादार,पवन कुडले, नागनाथ कोकणे,तानाजी कोकणे, श्रीरंग डोंगळे,तुकाराम बोंडगे,नरसिंग ठावरे,महेश कांबळे,मयुर कोकणे, युवराज कोकणे,इम्रान पठाण, संभाजी ठावरे,ज्ञानेश्वर बोंडगे, आकाश बिरादार,विष्णु पांचाळ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# बिंदुसरा धरणाच्या मोठ्या चादरीवर वड -पिंपळाची झाडे ; संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष ; नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन बेफिकीर :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०१ ) बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्वाच्या बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड,पिंपळ आणि लिंबासारखी झाडे उगवली असुन चादरीच्या बांधकामासाठी धोकादायक ठरणा-या झाडांची छाटणी व काढणी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे ३ वर्षांपासून करून सुद्धा पाटबंधारे विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धरणाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे . तज्ञांच्या मते झाडांच्या वाढत्या मुळांमुळे पाणी झिरपण्याची प्रक्रिया आधिक सुलभ होते.जी भविष्यात चादरीला तडे जाणे,गळती होणे किंवा पुर्ण रचना कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते.यामुळे शहराच्या जलस्त्रोतासह हजारो नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे प्रशासनाने तातडीने चादरीवरील अशी जीर्ण झाडे हटवून भिंतीची डागडुजी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी बीड,कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक ३ यांना केली आहे. ३ वर्षांपूर्वी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी निमित्त जिल्हा प्रशासनाच्या वरीष्ठ आधिका-यांच्या निदर्शनास आणुन सुद्धा दुर्लक्ष ; मान्सुनपुर्व तपासणी कागदावरच :- डॉ.गणेश ढवळे ११ सप्टेंबर २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त बीड शहरापासून बिंदुसरा धरणापर्यंत बिंदुसरा नदीच्या काठांवर प्रत्येकी ८ अशा १६ किलोमीटर अंतर लांबीच्या परीसरात मानवी साखळी पद्धतीने बांबुची ५ हजार ९७० रोपट्यांची लागवड करण्यात आली होती. तेव्हा बिंदुसरा धरणाच्या पायथ्याशी तत्कालीन जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा, पोलिस अधीक्षक नंदकुमार



ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अजित पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले होते. तेव्हा त्यांना मुख्य चादरीवरील उगवलेली झाडे दाखविण्यात आली होती तसेच लेखी निवेदनाद्वारे झाडे काढण्याची मागणी केली होती मात्र ३ वर्षे उलटुनही अद्याप चादरीवरील झाडे काढण्यात आली नाहीत. त्यामुळे एकंदरीतच नागरीकांना सतर्कतेचे आवाहन करणारे जिल्हा प्रशासन याबाबतीत बेफिकीर असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक सिंचन प्रकल्पाची पावसाळा सुरू होण्यापूर्वी आणि पावसाळा संपल्यानंतर तपासणी केली जाते.त्या तपासणीत भिंत, सांडवा आदी बाबी पाहिल्या जातात.मग असे असताना बिंदुसरा धरणाच्या मान्सुनपुर्व तपासणीत मुख्य चादरीवर उगवलेली झाडे पाटबंधारे विभागाच्या लक्षात कशी आली नाहीत हा खरा प्रश्न आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

### पाटबंधारे विभाग व जिल्हा प्रशासनाच्या हलगर्जीपणाचे गंभीर परिणाम बीडकरांना भोगावे लागतील :- रामनाथ खोड

बिंदुसरा धरणाच्या मुख्य चादरीवर वड, पिंपळ,लिंबासारखी झाडे उगवल्याचे आम्ही ३ वर्षांपासून निदर्शनास आणुन देऊन प्रशासनाला निवेदन देऊनही प्रशासन दुर्लक्ष करत असुन ही झाडे जशजशी वाढत जातील.तसातसा धरणाच्या रचनेला धोका वाढेल.आज नाही तर ऊद्या त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.अनेक किल्ले,गड,ईमारती अशा झाडांमुळे ढासळलेली आपण पाहतो.त्यामुळे शासनाने तातडीने दखल घेऊन हि झाडे काढण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २ जून २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## संस्कार...

संस्काराचे कुठले गणित नसते. संस्कार हे जीवनातले काव्य असते. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर ते काव्य आपल्याला साथ देत असते. माणूस कुठल्याही क्षेत्रात गेला, कितीही यश मिळाले तरी आईच्या संस्काराचे पारडे त्याच्या पलीकडचेच असते. आज मोबाईल आहे. जगात एका सेकंदात आपण कुणाशीही बोलू शकतो. संवाद करू शकतो. पण आपल्या घरातले आपल्या आईचे बोलणे, तिच्याशी झालेला संवाद कुणाचीच बरोबरी करू शकत नाही. आईच्या संस्काराची भाषा मायेची असते. प्रेमाची असते. ते नुसते शब्द असत नाही तर त्या प्रत्येक शब्दात ओलावा असतो. आपल्या घरातच आपले संस्कार असतात. त्या संस्काराचे विस्मरण होऊ न देणे आपल्या हातात असते. नव्याने संसारात पाऊल ठेवणाऱ्या लेकीसाठी ही उपदेशाची ओटी भरुन तीला निरोप द्यावा असे प्रत्येक आईला वाटले. आई ही प्रत्येक मुलीची नुसती आई नसते तर तिची सर्वात जवळची मैत्रीण असते,सखी असते ,हो ना...!!म्हणूनच ती सांगते अग सखी संसारात कधी मन डळमळीत झाले तर संयमाने सावर स्वतःला. अविश्वासाच शस्त्र हातात घेऊ नको. अग गृहिणीच्या मंद हास्यानं घरातील नंदनवन फुलत असतं. अग शेवटी पुरुष हा स्वतःसाठी जगतो अन् स्त्री ही घरासाठी जगते. म्हणूनच पुरुष जरी घराचा आधार असला तरी स्त्री ही त्याचा आत्मा असते.तरुण वय अन् लग्नाची नवी नवी वर्ष हा काळ आयुष्य घडवायचा असतो. या काळातच तू जो विश्वास संपादन करशील ,जे प्रेम जोडशील,जी नाती मायेने जोडशील तीच तुझी जन्मभराची मिळकत असेल.पुरुष जरी दिवसभर बाहेर असले तरी त्यांच मन उंबरठ्याच्या आतच घुटमळत असते. आपल्या घरातील सर्वांचा अभिमान असतो त्याला. त्याच्या अभिमानाला कधीही धक्का पोचेल असे वागू नकोस.विरहाचा अल्प काळ प्रेमाच्या हळुवार फुंकर मारून जोपासता आला पाहिजे. मनस्ताप,चिडचिड आणि कठोर शब्दांचे आघात यांचीच जर देवाणघेवाण झाली तर पुरुषाचं मन केव्हाच लक्ष्मणरेषा ओलांडून दूर जातं. अग सखी हा संसार म्हणजे एक समुद्र आहे. घरातील पुरुष जेव्हा सकाळी कामासाठी बाहेर पडतात तेव्हा ह्या सागरात आपली नौका मोठ्या जोमाने हाकतात, कधी उफळणार्या लाटेसोबत कितीही विहरली तरी एक गोष्ट कायम लक्षात ठेव की सरते शेवटी मावळतीला नौका ही किनाऱ्याला येतेच. म्हणून थोडे धीराने वाग आणि नेटका संसार कर.

**हिरकणी सौ.अनिता गुजर**
**डोंबिवली**
**८०९७५२४१९७**




# जॉय केवळ संस्था नाही तर चळवळ

जॉय ऑफ गिव्हिंगचे रोपटे आज वटवृक्ष बनले आहे. सामाजिक जाणीवेतून जोडल्या गेलेल्या संवेदनशील मनांची चळवळ बनली आहे. आपली नोकरी, प्रपंच सांभाळून सामाजिक कार्याचा ध्यास घेतलेल्या गणेश हिरवे यांच्या संकल्पनेतून आकारास आलेल्या जॉय संस्थेची वाटचाल आज सर्वांसाठीच अनुकरणीय बनली आहे. सोशल वर्क म्हणजे समाजसेवा हे आजच्या काळात केवळ प्रसिद्धी, स्वार्थ याचे प्रतीक समजले जाते. सध्या समाजात प्रामाणिक, निस्वार्थ समाजसेवेपेक्षा केवळ स्वार्थ, प्रसिद्धी व हेतूपूरस्कर इतरांसाठी काहीतरी करणाऱ्या प्रसिद्धीलोलुप कथित 'समाजसेवकांना' पाहिले तर ते काही अंशी खरेदेखील आहे. मात्र समाजातील गरीब, दुर्बल व गरजू लोकांसाठी निस्वार्थीपणे काहीतरी करण्याची मनिषा बाळगणारे लोकदेखील आपल्यात आहेत हेदेखील सत्य नाकारून चालणार नाही. त्यामुळे सामाजिक कार्य साकारणाऱ्या सर्वच लोकांना आपण एकाच तराजूत जोखण्यात तसा काही अर्थ नाही. तसे झालेच तर समाज कोलमडून पडेल व उरतील ती फक्त स्वतःपुरते विचार करणारी मतलबी माणसे. त्यामुळे कोणताही स्वार्थ वा हेतू न ठेवता इतरांसाठी काहीतरी करण्याची इच्छा ठेवणाऱ्या व्यक्तींना, संस्थांना व संघटनांना समाजाने उदात्त हेतूने स्वीकारायला हवे व त्यांच्या कार्याची दखल घ्यायला हवी असे माझे प्रामाणिक मत आहे. 'जॉय ऑफ गिव्हिंग' हा आमचा सोशल ग्रुप गेल्या काही वर्षांपासून निस्वार्थी भावनेने सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहे. विविध क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या दोनशेहून अधिक मान्यवर सदस्यांचा समावेश असलेला हा ग्रुप अनाथाश्रम, वृद्धाश्रम, आश्रमशाळा, झोपडपट्टी- आदिवासी भागातील लोकांसाठी अनेक समजोपयोगी उपक्रम राबवत आहे व अनेकानेक आशिर्वाद मिळवत आहे. या आशीर्वादाचे, समाधानाचे वाटेकरी आज संस्थेला मदत करणारे असंख्य हात आहेत. मुंबई व उपनगरांतील अनेक लोक या ग्रुपशी जोडले गेलेले आहेत ज्यांच्या माध्यमातुन सातत्याने लोकोपयोगी उपक्रम मुंबई, उपनगरे, पालघर, रायगड, ठाणे या परिसरात राबविण्यात येत आहेत. मीदेखील या ग्रुपचा एक सभासद आहे याचा मला निश्चितपणे सार्थ अभिमान आहे. याचे संपूर्ण श्रेय संस्थेचे सर्वेसर्वा व आम्हा सर्वांना एकत्र जोडून ठेवणारे गणेश हिरवे यांनाच जाते. गेल्या आठ दहा वर्षांपासून आम्ही संपर्कात आहोत. नवी मुंबई, ठाणे, पालघर मध्ये अनेक सामाजिक उपक्रम हिरवे सरांच्या सोबतीने राबवता आले. ग्रामीण, दुर्गम, आदिवासी भागातील मुलांना मदत पोहोचवता आली. खरेतर आपल्यासारख्या कुटुंबवत्सल लोकांना कुटुंब, नोकरी वा व्यवसायिक जबाबदाऱ्यातुन वेळ काढणे म्हणजे एक दिव्यच. त्यातून वेळ मिळालाच तर आपण एखादा आवडीचा छंद जोपासतो. माझेच उदाहरण घेतले तर कौटुंबिक व्याप व नोकरीतील व्यस्तता यातून दररोजच्या लिखाणासाठीदेखील वेळ काढणे जिकरीचे ठरते. त्यातुनच मग लोकलप्रवासात लिखाण करण्याचा मध्यम मार्ग मी निवडला व याच लोकल प्रवासामुळे लिखाणाचा छंद आज जोपासून आहे. हा लेखदेखील परवा लोकलप्रवासातच लिहिला आहे. असो, तर दैनंदिन व्यापातून वेळ काढून सामाजिक बांधिलकी जोपासणे व समाजकार्यात स्वतःला झोकून देणे हा विचार सर्वसामान्य व्यक्ती करूच शकत नाही. त्यातून समाजसेवा म्हटली की पदरमोड आली जी प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पाडताना सर्वांना जमेलच असे नाही. मात्र गणेश हिरवे सरांचे आजवरचे कार्य व त्यांची त्यातील तत्परता आपण जर पहिली तर हा माणूस इतक्या साऱ्या गोष्टी इतक्या सहजपणे कशा करू शकतो याचे मला खरेतर अप्रूप वाटते. पत्रलेखनाच्या माध्यमातून आपले सामाजिक जीवन सुरू करणाऱ्या हिरवे सरांचा मूळ पेशा शिक्षकी आहे. ज्ञानदानातील अद्वितीय कामगिरीमुळे त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे. सामाजिक कार्य व पत्रलेखनासाठी त्यांना आजवर शंभरहून अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. रक्तदानाने महत्व व सामाजिक गरज ओळखून त्यांनी आतापर्यंत स्वतः ४५ वेळा रक्तदान केलेले आहे. जोगेश्वरी येथे वास्तव्य करणारे हिरवे सर परिसरातील प्रत्येक सामाजिक, धार्मिक, राजकीय व क्रीडाविषयक उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेतात त्यामुळेच त्यांचा जनसंपर्कदेखील खूप दांडगा आहे. माणसे जोडण्याचा त्यांना मोठा छंद आहे. निस्वार्थी भावनेने समाजकार्य करणारी अनेक माणसे त्यांनी आपल्या जॉय ऑफ गिव्हिंग या सोशल माध्यमातील ग्रुपद्वारे




जोडलीत ज्यांच्या माध्यमातून त्यांनी अनाथ, वृद्ध, गरीब लोकांसाठी अनेक उपक्रम साजरे केले आहेत. सामाजिक बंधीलकीतून आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून लोकवर्गणीतून व प्रसंगी स्वतःची पदरमोड करून त्यांनी गरजूंना मदत केली आहे. आणि म्हणूनच मी त्यांच्या या उपक्रमांचा भाग आहे याचा मला खूप अभिमानच वाटतो. जोगेश्वरी येथील श्री समर्थ विद्यालय स्कूल कमीटीचे ते सभासद आहेत. राजहंस प्रतिष्ठान, गोरेगावचे सभासद असून त्या माध्यमातून अवयवदान व देहदान चळवळीसाठी त्यांनी सक्रिय योगदान दिलेले आहे. माजी पोलीस आयुक्त श्री वसंत ढोबले साहेब यांच्या मिसिंग पर्सन ब्यूरो या हरवलेलया व्यक्ति शोधून काढणाऱ्या NGO चेदेखील ते सक्रिय कार्यकर्ते आहेत. जॉय ऑफ गिविंग या सामाजिक संस्थेचे संस्थापक, मुंबईतील विविध सामाजिक संस्था व उत्सव मंडळांवर सल्लागार, दै मुंबई मित्र चे प्रतिनिधी, संत निरंकारी आध्यात्मिक मिशन चे सक्रिय कार्यकर्ते, एपीजे अब्दुल कलाम मोफत वृत्तपत वाचनालयाचे संस्थापक व संत नामदेव परीवाराचे कार्यकर्ते असा त्यांचा सामाजिक क्षेत्रातील प्रवास व लेखाजोखा आहे. इतका सारा व्याप सांभाळून ते आपल्या मित्रमंडळीबरोबर कायम संपर्कात राहतात व विविध सामाजिक प्रश्नांवर चर्चा करतात, त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. हिरवे सरांबरोबर मी गेली अनेक वर्षे संपर्कात असून सामाजिक उपक्रमाच्या अनेक मोहिमा आम्ही एकत्र आखल्या आहेत. जॉयच्या शिलेदारांच्या साथीने आजवरच्या सर्वच मोहीमा आम्ही यशस्वी करून हजारो गरजूंना सहकार्य केलेले आहे. एखादा ज्वलंत विषय घेऊन अधूनमधून मला आवर्जून भेटतात, फोन करतात व आपली भूमिका वृत्तपत्रांच्या माध्यमातून मांडण्यासाठी बजावतात. अत्यंत प्रामाणिक हेतूने समाजासाठी झोकून देऊन काम करणारी गणेश हिरवे सरांसारखी माणसे खरेतर या मतलबी जगात दुर्मिळच असून त्यामुळेच आम्हाला त्यांचा हेवा वाटतो. सामाजिक सेवेतील व्यापातून पुरेसा वेळ काढून त्यांनी आपले कौटुंबिक स्वास्थ्यदेखील उत्तम जपले आहे. पत्नी व दोन मुले असा त्यांचा परिवार असून त्यांच्याशी बोलताना नेहमीच त्यांची परिवाराप्रति असलेली एक अतूट जोड व निसंदिग्ध प्रेमभावना प्रकट होते. माझ्यातील वृत्तपत्रलेखक जागता ठेवण्यामध्ये हिरवे सरांचा खूप मोठा वाटा असून त्याबद्दल माझ्या मनात त्याचेंबद्दल नितांत आदर आहे. मला सामाजिक कार्याची आवड निर्माण करण्यामागे हिरवे सरांचा मोठा वाटा आहे. ह्या कार्याची आता इतकी सवय लागलीय की गरजूंना मदत करण्यासाठी मी सतत प्रयत्नशील असतो. मित्रमंडळी, हितचिंतक यांच्यामार्फत गरजूंसाठी अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवत असतो. मध्ये हिरवे सरांच्या आजारणात त्यांच्या अनुपस्थितीतदेखील जॉयच्या माध्यमातून अनेक उपक्रम साजरे करण्याची जबाबदारी घेतली व पेललीदेखील. आज जॉय चा १०वा वर्धापन दिन साजरा होत असताना जॉयच्या मागील दहा वर्षाच्या कारकिर्दीत घेतलेले असंख्य उपक्रम एखाद्या वेब सिरीजसारखे डोळ्यासमोरून जातात. सामाजिक उपक्रमांचे एकामागोमाग किती सिझन आम्ही घेतले याची गिणतीही करणे आता सोडून दिलेय.

# टेम्पो व रिक्षाचा भीषण अपघात, पती-पत्नीसह एकूण चार जण ठार

नित्रुड -माजलगाव रस्त्यावर अपघातात महामार्गावरील तेलगाव-माजलगाव रस्त्यावर रविवारी रात्री ११ .३० वाजेदरम्यान अपघात होऊन त्यात चार जण ठार तर काही गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. जखमींना माजलगाव येथील रूग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. मयतांमध्ये पती-पत्नीचा समावेश आहे. हा अपघात एवढा भीषण होता की, आयशरने अपेला जवळपास ३० ते ४० फूट पर्यंत फरफटत नेले. घटनास्थळी दिंद्रुड पोलीस तात्काळ दाखल झाले. यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील भाटवडगाव येथील काही लोक अपे क्र. एमएच २३ एन ०२७३ ने रविवारी अकरा ते साडे अकरा वाजेदरम्यान तेलगावकडून माजलगावकडे जात असताना सदरील अपे नित्रुड जवळील एका पेट्रोल पंपासमोर आला असता समोरून येणाऱ्या



आयशर क्र एमएच २३ एम ९२५५ ने अपेला जबरदस्त धडक दिली. आयशरने धडक देताच अपे जवळपास ३० ते ४० फूट दूर पर्यंत फरफटत नेले. या भीषण अपघातात अपेमधील तीन जण जागीच ठार झाले असून, मयतात एका महिलेचा समावेश आहे.याशिवाय आणखी एकाचाही मृत्यू झाला आहे. सर्व जखमी गंभीर आहेत. त्यांना तेलगाव येथील रूग्णवाहिकेने माजलगाव येथील रूग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. यात फारूक चॉद सय्यद, त्यांच्या पत्नी सय्यद शबाना फारूक, शेख नोहिद एजाज आणि फैजान रफिक सय्यद अशी चौघांची नावे आहेत. मयताच्या जवळ असलेल्या आधारकार्डवरून त्यांची ओळख झाली. अपघातातील इतर मयत व जखमींचे नावे उपलब्ध होऊ शकले नाहीत. आयशर चालक घटनास्थळावरून पसार झाला. अपघाताची माहिती मिळताच दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि महादेव ढाकणे यांच्यासह पोलीस कर्मचारी महेश साळुंखे, खलील मोमीन, सचिन गायकवाड, कानदास बनसोडे, चामनर आदि तात्काळ घटनास्थळी दाखल झाले

# चोरीच्या सात मोटार सायकली पकडल्या, पाच गुन्हे उघड - स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

बीड दि.01/(प्रतिनिधी):
मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये होणाऱ्या मोटर सायकल चोरीच्या गुन्हयामध्ये वाढ झाल्याने मोटर सायकल चोरीचे गुन्हे जास्तीत जास्त उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेनेशर्थीचे प्रयत्न सुरु केले होते. दिनांक 30/05/2025 रोजी पोलीस हवालदार भागवत शेलार यांना माहीती मिळाली की , अंबाजोगाई शहरातुन चोरी गेलेल्या गाडया तळेगांव शिवारामध्ये घरामध्ये विक्रीसाठी ठेवल्या असुन त्याची डिल होणार आहे. या बातमीवरुन स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोउनि सिध्देश्वर मुरकुटे व पथकाने तळेगाव येथे छापा मारला असता, आरोपी शेख ईलियास शेख गफार, वय 25 वर्ष, रा तळेगांव ता.जि बीड. हा चोरीच्या गाडयासह मिळाला.आरोपीकडुन एकुण 07 मोटार सायकली तपासकामी जप्त केल्या.त्या मोटार सायकली अंबाजोगाई, जालना, छत्रपती संभाजीनगर येथुन चोरल्याचे आरोपीने सांगीतले.आरोपीकडे मिळुन आलेल्या मोटार सायकलींचे वर्णन खालीलप्रमाणे अ.क्रप्रकार व कंपणी रंग चेसीस नंबर दाखल गुन्हे 01 होडा ड्रिम युगा काळया रंगाची ME4JC558AEGT27030 अंबाजोगाई शहर 179/2024 कलम 379 भा.दं.वि 02 हिरो स्प्लेंडर प्लस काळी सिल्वर पट्टा MBLHAR-087J5F00402 अंबाजोगाई शहर 298/2023 कलम 379 भा.दं.वि 03 हिरो HF DELUXE सिल्वर रंगाची MBLHAR206H5D01035 तालुका जालना 147/2025 क 303(2) BNS 04 हिरो HF DELUXE लाल रंगाची MHLHAR209JGF14166 बेगमपुरा छ.संभाजीनगर 56/2025 क 303(2) BNS 05 हिरो सिबी शाईन काळी लाल सिल्वर पट्टा ME4J-C65AKJ7218187 बेगमपुरा



छ.संभाजीनगर 61/2025 क 303(2) BNS 06 होंडा सिबी शाईन काळया रंगाची ME4JC653HG7013628 अभिलेख मिळुन आला नाही 07 होंडा सिबी शाईन काळया रंगाची ME4JC36JDD7390939 अभिलेख मिळुन आला नाही. आरोपीकडुन एकुण 05 चोरीचे गुन्हे उघडकीस आले.असा एकुण 07 मोटार सायकली किं.अं 6,00,000/- मुद्देमाल जप्त केला आहे.



बीड: छत्रपती संभाजी नगर येथे सकाळ समूहाच्या वतीने नारायण गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांना आध्यात्मिक कार्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या सन्मानाबद्दल बाबांचे बीड येथे स्वागत करून आशीर्वाद घेताना गडाचे विश्वस्त बळीराम गवते, किसनराव गवते हनुमान मुळीक, नितीन सांगुळे, गोविंद गवते, ज्ञानेश्वर गवते, चंद्रकांत डोळस, भैय्या लाटे, सुरज गवते, इत्यादी गडाचे भक्त.

# जेजुरी गडावर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती उत्सव साजरा

हिंदू धर्मरक्षक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त श्री क्षेत्र मार्तंड देवस्थान, जेजुरी मल्हारगड येथे उत्सवी वातावरणात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजमाते अहिल्याबाईंच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून भंडाऱ्याची उधळण करत उत्सवाची सुरुवात झाली. उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे 300 शालेय विद्यार्थिनींचे कन्यापूजन करण्यात आले. या सर्व मुलींना शैक्षणिक साहित्य देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने प्रदान करण्यात आले. याप्रसंगी पुरंदरचे आमदार तथा माजी मंत्री विजय बापू शिवतारे, मा. आमदार अशोक टेकवडे यांच्यासह अनेक मान्यवर, देवस्थानचे माजी विश्वस्त, खांदेकरी, मानकरी, पुजारी व ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी बोलताना श्री मार्तंड देव संस्थानचे विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर म्हणाले, "राष्ट्रनिर्माणासाठी धर्मसुरक्षा अत्यावश्यक आहे. आणि धर्मसुरक्षा ही मंदिरनिर्माण



व मंदिराच्या पावित्र्याविना अशक्य आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे या कार्यातील योगदान अतुलनीय आहे." तसेच, देवस्थानच्या वतीने 300 नामांकित जोडप्यांकडून मल्हारयागाचे आयोजन करण्यात येणार असून वटपौर्णिमा व जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून त्यांना वडाच्या झाडांची भेट दिली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सामाजिक बांधिलकी जपत श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टच्या वतीने 300 मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याचेही डॉ. खेडेकर यांनी सांगितले. या वेळी सिने नाट्य बालकलाकार श्रीश खेडेकर याने प्रसारित केलेल्या "अहिल्याबाई नव्हे, हिंदू धर्मरक्षक पुण्यश्लोक अहिल्यादेवी" या व्हिडीओचाही विशेष उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. खेडेकर यांनी सांगितले की, "समर्पित भावनेने केलेलं धर्मकार्य, देवस्थानाचं आणि राष्ट्राचं पावित्र्य जपणं, समाजात न्याय व समरसता निर्माण करणं हेच अहिल्यादेवींच्या कार्याचे खरे सार आहे." श्री मार्तंड देव संस्थानचे विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी धर्मकार्य आणि जनकल्याणासाठी घेतलेली पुढाकाराची भूमिका उल्लेखनीय ठरली आहे.

# कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवाळ यांचा ईस्लापुर दौरा हुंडी येथे शेतकऱ्यांशी साधणार संवाद



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : राज्याचे अन्न व औषधी प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचा दि.२-जून रोजी इस्लापूर भागात दौरा असून सहस्त्रकुंड रेल्वे स्थानकावर सकाळी आठ वाजता त्यांचे आगमन होणार आहे. त्यानंतर मराठवाडा व विदर्भाच्या सिमेलगत खळवळून वाहणारा व पावसाळ्यात पर्यटकांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा सहस्त्रकुंड धबधबा या ठिकाणी महादेवाचे दर्शन घेऊन पर्यटन स्थळाची पाहणी करणार आहेत.

त्यानंतर बोधडी परिसरातील थारा या गावी एका विवाह समारंभाला उपस्थित राहुन हा विवाह समारंभ आटोपून हुडी येथील कार्यकर्ते निर्गुण पाटील कदम यांच्या फार्म हाऊस वर भेट देऊन या ठिकाणी देखील कार्यकत्यांशी संवाद साधणार आहेत . यावेळी कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. ईस्लापूर भागातील सर्व कार्यक्रम आटोपून ते दुपारी नांदेडकडे प्रयाण करतील नांदेड गुरुद्वारा येथे दर्शन घेऊन सायंकाळी नांदेड रेल्वे स्थानकावरून मुंबईकडे जाणार आहेत.

# आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात लोकशाही दिनाचे आयोजन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार २-जून रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन




भवन येथे आयोजित केला आहे. या दिवशी महसूल, गृह, मुख्य जिल्हा कार्यकारी परिषद, अधिकारी पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल.

लोकशाही दिनाच्या दिवशी प्राप्त होणाऱ्या जनतेच्या तक्रारी, अडचणी एकत्रीतरीत्या समजावून घेऊन त्या शक्य तितक्या लवकर सोडविण्यात येतील, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी दिली आहे.

# पिठ्ठी ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



पाटोदा प्रतिनिधी ग्रामपंचायत कार्यालय पिठी येथे दि.३१ वार शनिवार रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी सरपंच डॉ. प्रभाकर कवठेकर, उपसरपंच सुरेश वादगे, ग्रामपंचायत सदस्य कचरू काळे, महादेव भोंडवे पाटील पिंटू मामा जागडे, अनिल भोंडवे, बंडू भोंडवे, संतोष सोनसळे, सदाशिव भोंडवे, प्रकाश कुडके, हनुमान गाडे व इतर गावकरी उपस्थित होते .



गेवराई - तालुक्यातील सुशी येथे राजमाता राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

# खरात आडगाव जलजीवन चे काम निकृष्ट गुत्तेदार इंजिनियर च्या संगणमत ने लाखोचा भ्रष्टाचार गावकरी लवकरच करणार आंदोलन

माजलगाव (प्रतिनिधी) माजलगाव तालुक्यात खरात आडगाव येथे गावाला पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून जलजीवन अंतर्गत योजना राबवण्यात आली मात्र सदर योजनेत जल जीवन चे काम निकृष्ट करण्यात आले असून सदर योजनेच्या गावात कुठलाच फायदा होत नाही सदर योजनेमध्ये इंजिनियर आणि गुत्तेदार यांनी लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केल्याने खरात आडगावकर आणखीनही पाण्यापासून वंचित आहेत गुत्तेदार आणि इंजिनियर यांच्यावर चौकशी करून तात्काळ कारवाई करा या मागणीसाठी गावकरी आंदोलन करणार असल्याचे कळत आहे माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव बहुजन समाजाचा गाव खरात आडगाव मधील लोकसंख्या एकूण जवळपास आठ हजाराच्या पुढे आहे गाव मोठा असल्याने गावाचा कायमस्वरूपी पाणी प्रश्न सोडवण्यासाठी बीड जिल्हा परिषदेने जल जीवन योजनेअंतर्गत गावाचा समावेश करून गावाला शुद्ध पाणी मिळावे म्हणून प्रयत्न केले मात्र जल जीवन योजनेचे इंजिनीयर आणि गुत्तेदार यांनी यामधूनही फक्त पैसे कमवीण्याचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून काम केले निकृष्ट दर्जाचे पाईप वापरल्याने गावकऱ्यांना पाणी मिळणे अगोदरच पाईपलाईन शंभर जागेवर फुटली यामुळे खरात आडगाव येथील जनता पाण्यापासून वंचित राहिले जल जीवन योजना म्हणजे गुत्तेदार पोचण्याची योजना आहे का? असा प्रश्न गावकरी व्यक्त करत आहेत सदर गुटेदाराने आणि इंजिनीयरने निकृष्ट दर्जाची जलजीवन योजना राबवली यामध्ये पाणी साठवण्यासाठी पाण्याच्या उंच टाकीचे प्रयोजन असते टाकी तर उभा राहिलीच नाही मग पाणी साठवणार कुठे? जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे काय साठे लोटे तर नाही ना असा प्रश्न खरात आडगाव येथील जनतेला पडला असेल सदर गुत्तेदार आणि इंजिनियर यांचे बिलीन काढू नका अन्यथा खरात आडगाव येथील समस्त गावकरी बहुसंख्येने उपस्थित राहून जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यासमोर आंदोलन करतील असा इशारा गावकऱ्यांनी बोलताना व्यक्त केला आहे

# ट्रक-मोटार सायकल अपघातात मोटार सायकल स्वाराचा मृत्यू.संतप्त तरुणांनी केला रास्ता रोको.

माजलगाव. राष्ट्रीय महामार्ग-५४८पंढरपुर -खामगाव (पालखी महामार्ग) म्हटले जाते याच मार्गावर माजलगाव तालुक्यातील टालेवाडी पाटीच्या पुढे पुला च्या जवळ ट्रक व मोटारसायकल च्या झालेल्या अपघातात मोटार सायकल स्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.

धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.

प्रकरणी समजलेली माहिती अशी की,तेलगाव ता.धारूर येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात नोकरी असलेले महारूद्र भिमराव लोंढे(३९वर्षे) रा.खालापुरी ता.जि. बीड ह.मु.सुंदरनगर तेलगाव हे मोटार सायकल क्र.एमएच.२३/७४२४ने रविवार १जुन रोजी दुपारी २वा तेलगावकडुन माजलगावकडे नमुद महामार्गा वरुन



प्रवासात असताना उपरोक्त नमुद रस्त्यावर पडलेल्या भेगा चुकवताना समोरून भरधाव वेगात येत असलेल्या ट्रक क्र.एमएच.४४/७३७१ जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात महारूद्र लोंढे यांचा जागीच मृत्यू झाला.

## एमएमआरडी कडुन कधी होणार सीआरडीए महामार्गचे हस्तांतरण.

माजलगाव तालुक्यातुन राष्ट्रीय महामार्ग-६१ (कल्याण -निर्मल),५४८सीसी (पंढरपूर -खामागाव) हे दोन महामार्ग जातात पण आजतागायत हे दोन्ही महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात आले आहेत आणि ते त्यांच्याच अखत्यारीत येत आहेत.ते अद्याप केंद्रीय रस्ते विकास प्राधिकरण कडे हस्तांतरित करण्यात आले नाहीत म्हणून देखभाल, दुरुस्ती, रुंदीकरण करण्याचं काम सुरू होत नाही हे खरे राजकारणातून अर्थकारण आडवे आल्याची माहिती समजली असुन हे महामार्ग महाराष्ट्र सरकार केंद्र सरकार कडे कधी वर्ग करणार आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

एमएमआरडी सह आमदार व जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सदरील महामार्गा वरील पडलेल्या भेगा कामय स्वरुपी बुजण्याचे अथवा हा मार्ग व्यवस्थीत दुरुस्त न केल्याने आता पर्यंत अनेक अपघातात कित्येक जणांचा मृत्यू झाला तर अनेक जणांना कायमचे अपंगत्व आले आहे. सदर अपघातात नंतर संतप्त झालेल्या टालेवाडी व परीसरातील तरुणांनी एमएमआरडी सह आमदार व जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षाचा निषेध व्यक्त करत दोन तास रास्ता रोको केला.

# माजलगावात ५०० रुपयात डायलासिस करणारे महाराष्ट्रातील पहिले खाजगी रुग्णालय

## १०७०० रुग्णावर मोफत डायलासिस संजीवनी हॉस्पिटलचा स्तुत्य उपक्रम





मी वैद्यकीय सेवा करत असताना कधीच पैसा हा केंद्रस्थानी मानला नाही माझा रुग्ण हा पूर्णपणे बरा झाला पाहिजे व कमीत कमी आर्थिक भार रुग्णांच्या कुटुंबीयांवर यावा ही माझी प्रामाणिक इच्छा असते या भावनेतून मी डायलिसिसचा हा उपक्रम राबवला आहे.

**-डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले**
**संजीवनी हॉस्पिटल**
**माजलगाव**

मी संभाजीनगर येथे डायलासिस करण्यासाठी जात होतो.यामुळे माझ्या कुटुंबावर भार पडत होता. आता माजलगावतच संजीवनी हॉस्पिटल मध्ये गुणवत्ता पूर्ण डायलासिस अल्प दरात सेवा मिळत असल्याने माझा संभाजीनगर येथे जाण्यासाठी लागणारा खर्च होत नसून माझ्या कुटुंबावर भार ही पडत नाही.

**आकाश सुरेश घटे**
**डायलासीस रुग्ण**



माजलगाव - येथील संजीवनी हॉस्पिटल चे डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले हे नेहमीच समाजसेवेमध्ये अग्रेसर असतात गरीब रुग्णांना मोफत उपचार केल्याचे अनेक उदाहरणे समोर आहेत. या रुग्णालय मध्ये आता अल्प दरामध्ये डायलासिस ची सेवा मिळणार आहे. आतापर्यंत या रुग्णालयामध्ये १०७०० रुग्णावर अल्प दरामध्ये डायलिसिस करून विविध वैद्यकीय सेवा रुग्णांना उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. किडनी रोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांना डायलिसिस सेवेची गरज भासत होती. रुग्णांना यासाठी संभाजीनगर, बीड,पुणे येथे जावे लागत होते. रुग्णांना हि सोय माजलगावत उपलब्ध होत नव्हती रुग्णाची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन डायलासिस सेवा संजीवनी हॉस्पिटलमध्ये सुरू केली. सुरुवातीला त्यांनी १२०० रुपये दराने ही सेवा चालू केली होती परंतु रुग्णांची परिस्थिती,वारंवार डायलिसिस या गोष्टीमुळे रुग्ण व त्यांचे कुटुंबीयांचे होणारे हाल पाहून डॉ. गिलबिले यांनी एक धाडसी निर्णय घेतला आपण समाजाचे देणे लागतो आपण सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेतलेला असून या रुग्णांचे दुःख आपण पाहिले. या भावनेतून रुग्णांना मोफत मेडिसिन व इतर खर्चाचे शुल्क ५०० रुपये घेऊन डायलासिस सेवा पुरवण्याचे ठरवले अशा प्रकारचे सेवा देणारे महाराष्ट्रातील पहिले खाजगी रुग्णालय ठरले. आजपर्यंत संजीवनी हॉस्पिटलमध्ये १०७०० रुग्णावर डायलिसिस पूर्ण केले असून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

## आंतरराष्ट्रीय



# हमासला मोठा झटका, एअर स्ट्राईकमध्ये नेता मोहम्मद सिनवार ठार, इस्त्रायलचा दावा काय?

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यानंतर आता इस्त्रायलच्या संरक्षण अधिकाऱ्यांनी हमासला मोठा झटका दिल्याचा दावा केला आहे. एअर स्ट्राईकमध्ये हमासचा कमांडर मोहम्मद सिनवार मारल्या गेला. इस्त्रायलच्या अधिकाऱ्यानुसार, 13 मे रोजीच्या हवाई हल्ल्यात तो मारल्या गेला. एका रुग्णालया खाली असलेल्या सुरुंगात करण्यात आला. येथेच सिनवार लपल्याचा संशय होता. त्यामुळेच तिथे हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ठार झालेल्या सिनवारचे अनेक फोटो समोर आले आहे.

या महिन्याच्या सुरुवातीलाच गाजा पट्टीत ही कारवाई करण्यात आली. एका रुग्णालयाच्या खाली सुरूंग खोदण्यात आला होता. त्यात मोहम्मद सिनवार हा लपला होता. हवाई हल्ल्यात या ठिकाणी बॉम्ब टाकण्यात आला. या कारवाईत सिनवार याच्यासह अजून दो कमांडर मारल्या गेले. सिनवार हा हमासमधील प्रमुख नेता होता. तोच गेल्या काही दिवसांपासून इस्त्रायलच्या ओलिसांना सोडण्यास विरोध करत होता. तो युद्ध विरामाला पण विरोध



करत होता. त्यामुळे हमास आणि इस्त्रायलमध्ये तणाव वाढला होता.

इस्त्रायलच्या सैन्याने सिनवार मारल्या गेल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहून यांनी सुद्धा सिनवार ठार झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. मोहम्मद सिनवार याचा मोठा भाऊ याह्या सिनवार हा हमासचा प्रमुख होता. ऑक्टोबर 2023 मध्ये इस्त्रायलवर हल्ला करण्यामागे याह्या हाच होता. तो गेल्यावर्षी इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात मारला गेला होता मोहम्मद सिनवार कोण? मोहम्मद हा याह्या सिनवार याचा लहान भाऊ आहे. जुलै 2004 मध्ये हमासच्या लष्करी विंगचे त्याला प्रमुखपद देण्यात आले होते. तो हमासच्या खान युनिस ब्रिगेडचा कमांडर पण होता. सिनवार याची माहिती देणाऱ्याला इस्त्रायलने 3,00,000 डॉलरचे बक्षीस जाहीर केले होते. तर याह्या खान हा इस्त्रायलने 16 ऑक्टोबर 2024 रोजी केलेल्या हल्ल्यात ठार झाला होता. आता मोहम्मद सुद्धा ठार झाल्याने हमासला हा मोठा झटका मानण्यात येत आहे. तर दुसरीकडे ओलीस सुटण्याची आणि युद्ध विरामाकडे वाटचाल होण्याची शक्यता पण बळावली आहे.

# शेख हसीनाला मृत्यदंड? बांग्लादेशात असा आवळल्या जात आहे हसीनाला फास

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अडचणी वाढल्या आहेत. आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात (ICT) अभियोक्ता पक्षाने गेल्या जुलै महिन्यात त्यांच्या सरकारविरोधातील उठवादरम्यान केलेली कारवाई ही मानवतेविरुद्ध गुन्हा असल्याचा ठपका ठेवला आहे. अभियोक्त्याने रविवारी याप्रकरणी दोषारोपपत्र दाखल केले आहे. जर शेख हसीना यांच्या सरकारविरोधात हे आरोप सिद्ध झाले तर शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुद्धा होऊ शकते. या दोषारोपपत्रात शेख हसीना यांच्यासह माजी गृहमंत्री असदुज्जमां खान कमाल आणि माजी IGP चौधरी मामून हे सह आरोपी आहेत. या खटल्याचे बांगलादेशातील टीव्हीवर थेट प्रसारण करण्यात येत आहे. त्यामुळे याप्रकरणात पारदर्शकता कायम असेल. 12 मे रोजी सादर केला अहवाल शेख हसीना यांच्यावर लावलेल्या आरोपातजुलै



आणि ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेला हिंसाचार आणि त्यानंतर पोलिसांनी केलाला गोळीबार, सामूहिक हत्याकांड करण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे म्हटले आहे. यापूर्वी 12 मे रोजी तपास अधिकाऱ्यांनी एक अहवाल सादर केला होता. त्यामध्ये शेख हसीना यांचा या हत्याकांडामागे हात असल्याचे म्हटले होते. त्यांनीच याविषयीचे आदेश दिल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. महत्त्वाचा भाग म्हणजे ज्या न्यायाधिकरणात हा खटला सुरू आहे. ते पाकिस्तानातून स्वतंत्र झाल्यानंतर पाक सैनिकांवर खटला चालवण्यासाठी सुरू करण्यात आले होते. या न्यायाधिकरणात यापूर्वी जमात आणि BNP नेत्यांविरोधात खटले चालवण्यात आले आहेत. त्यांना मृत्यूदंड पण ठोठावण्यात आला आहे. शेख हसीना भारताच्या आश्रयाला तख्तापालट नंतर शेख हसीना या भारताच्या आश्रयाला आल्या आहेत. देशात एका खास गटाने सत्ता उलटण्यासाठी हिंसाचार घडवून आणला होता. त्यानंतर हसीना यांनी भारतात पलायन केले. बांगलादेशातील सध्याचे युनूस सरकार शेख हसीना यांना बांगलादेशात परत पाठवण्याची मागणी करत आहे.

## पाण्यावर वसलेले सुंदर गाव, नावेतून करावा लागतो प्रवास, बाजारही नावेतून करावा लागतो...



पाण्यावर वसलेल्या व्हेनिस शहराबद्दल तुम्ही नक्कीच ऐकले असेल, परंतू पाण्यावर बांधलेल्या गावाबद्दल तुम्ही ऐकले आहे का? १९९५ मध्ये हॉलिवूड चित्रपट 'वॉटर वर्ल्ड' प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात संपूर्ण शहर पाण्यावर बांधलेले दाखवण्यात आले होते. असेच एक गाव आफ्रिकेतही आहे. ही झोपडी सदृश्य वस्ती बेनिनमध्ये आहे, या गावाचं नाव गॅन्व्ही (Ganvie) आहे. त्याला 'आफ्रिकेचे व्हेनिस' असे म्हटले जाते. येथील जलमार्गातून सुंदर बोटी चलविण्यात येतात,हे गाव व्हेनिससारखेच दिसते. परंतु प्रत्यक्षात येथील घरे इटलीच्या व्हेनिसपेक्षा खूपच वेगळी आहेत. गॅन्व्ही हे आफ्रिकेचा एक देश बेनिनमधल्या कोटोनूजवळील नोकोई सरोवरावर वसलेले एक गाव आहे. बेनिनची राजधानी अबोमी येथे दोन राजवाडे आहेत, तेथे मानवी कवटीवर सिंहासन आहे. आपण जगातील विचित्र आणि रहस्यमयी ठिकाणांचा विचार केला तर हे तलावावर बांधलेले विचित्र गाव त्यापैकी एक आहे. येथे ३० हजारांहून अधिक गावकरी आहेत, जे बांबूपासून बनवलेल्या घरात राहतात. सर्व घरे लाकडाच्या आधारावर उभी आहेत. जरी हे शहर पाण्यावर वसलेले असले तरी पिण्याच्या पाण्याची येथे सर्वात मोठी समस्या आहे.

## ऑपरेशन सिंदूर शिगेला पोहोचला असताना अचानक शस्त्रसंधी का?



भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले. ऑपरेशन सिंदूर शिगेला पोहचला असताना १० मे रोजी संध्याकाळी भारत आणि पाकिस्तानमध्ये अचानक शस्त्रसंधीची घोषणा झाली. या निर्णयाबद्दल अनेकांना आश्चर्य वाटले. जनतेच्या मनात हा प्रश्न निर्माण झाला की इतक्या लवकर हा निर्णय का घेण्यात आला. काय म्हणाले सीडीएस अनिल चौहान? शस्त्रसंधीच्या निर्णयास सुमारे २० दिवस झाले. त्यानंतर आता याबद्दल स्पष्टीकरण आले आहे. शनिवारी सिंगापूरमध्ये झालेल्या शांग्री-ला संवादमध्ये सीडीएस जनरल अनिल चौहान यांनी त्याचे कारण स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, भारताने हे पाऊल उचलण्यामागे रणनीतीचा भाग आहे. भारताने तीन दिवसांत आपले ठरवलेले सर्व लक्ष्य साध्य केले होते. यामुळे कारवाई थांबवणे योग्य पाऊल आहे.

# युक्रेनचा रशियावर मोठा हल्ला, ४ एअर बेस उडवले, ४० विमानं ध्वस्त

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध अजूनही थांबलेलं नाही. दोन्ही देश एकमेकांवर जोरदार हल्ले करत आहेत. एकीकडे शांततेसाठी प्रयत्न होत असताना दुसरीकडे दोन्ही देश एकमेकांवर वेगवेगळ्या माध्यमातून हल्ले करताना दिसत आहेत. दरम्यान, मिळालेल्या ताज्या माहितीनुसार युक्रेनने रशियाच्या चार महत्त्वाच्या हवाई तळांवर मोठे हल्ले केले आहेत. या हल्ल्यांमुळे आता रशियादेखील प्रत्युत्तरादाखल मोठे हल्ले करण्याची शक्यता आहे. सर्वाधिक मोठा ड्रोन हल्ला युक्रेनने



रशियाचे ओलेन्या, बेलाया या हवाई तळांवर थेट हल्ला केला आहे. या हल्ल्यांसाठी युक्रेनने ड्रोनची मदत घेतली आहे. ज्या ठिकाणी युक्रेनने हे हल्ले केले आहेत, ती ठिकाणी रशिया-युक्रेनच्या सीमेपासून फार दूर आहेत, अशी माहिती आहे. युक्रेनमधील माध्यमांनुसार युक्रेनच्या सैन्याने आतापर्यंत केलेल्या हल्ल्यांमधील सर्वाधिक मोठा ड्रोन हल्ला आहे. रशिया ज्या ठिकाणाहून युक्रेनला लक्ष्य करत होते त्याच ठिकाणांवर युक्रेनने ड्रोन हल्ले केले आहेत. 40 पेक्षा जास्त बॉम्बर्स ध्वस्त या हल्ल्यानंतर युक्रेनने अधिकृत प्रतिक्रिया दिली आहे. युक्रेनच्या लष्कराने रशियातील काही हवाई तळांवर हल्ले केले आहेत. या हल्ल्यांत 40 पेक्षा जास्त बॉम्बर्सना युक्रेनने ध्वस्त केलं आहे. याच बॉम्बर्सचा उपयोग युक्रेनवर हल्ला करण्यासाठी केला जात होता. मरमंस्कमधील ओलेन्या हवाई तळ, इरकुत्स्कमधील बेलाया एयर बेस, इवानोवो येथील इवानोवो हवाई तळ तसेच डायगिलेवो अशा एकूण चार हवाई तळांना लक्ष्य केलं आहे. रशियाची कोणत्या विमानांवर हल्ला युक्रेनच्या सुरक्षा सेवेने दिलेल्या माहितीनुसार या हल्ल्यांत रशियाची Tu-95, Tu-22 यासारखी मोठी बॉम्बर्स विमानं तसेच दुर्मिळ आणि महागडे A-50 जासुसी विमानांना ध्वस्त करण्यात आलं आहे.

# पाण्याशिवाय लाखो पाकिस्तानी मरतील: शाहबाज शरीफ, भारताने खडसावले, आधी दहशतवाद बंद करा

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावाचे वातावरण आहे. भारताने पाकिस्तानवर अनेक पातळयांवर कारवाई केली. सिंधू जल करार स्थगित केला. तसेच ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे नऊ तळ नष्ट केले. या सर्वांचा परिणाम पाकिस्तानवर दिसून येत आहे. आता पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना पाण्याचे महत्व समजले आहे. पाण्याशिवाय लाखो पाकिस्तानी मरतील, असे त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर म्हटले



आहे. त्याला भारताने ठोस उत्तर देत आधी दहशतवाद्यांना पाठिंबा देण्याचे उद्योग बंद करण्याचे खडसावले आहे. भारताने म्हटले आहे की, पाकिस्तानने सीमापार दहशतवाद पसरवून सिंधू जल कराराचे उल्लंघन केले आहे. सिंधू जल कराराच्या सुरुवातीला लिहिले आहे की, हा करार चांगल्या हेतूने आणि मैत्रीने करण्यात आला आहे. या कराराचे प्रामाणिकपणे पालन करणे खूप महत्वाचे आहे. परंतु सीमेपलीकडून होणारा दहशतवाद या कराराच्या अंमलबजावणीत अडथळा आणत आहे, असे परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी म्हटले. ताजिकिस्तानमध्ये झालेल्या बैठकीत पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारतावर आरोप केला. ते म्हणाले, पाकिस्तान भारताला आयडब्ल्यूटी थांबवू देणार नाही. सिंधू जलकरार स्थगित करुन भारत लाखो लोकांचे जीवन धोक्यात आणत आहे. शाहबाज शरीफ यांना जोरदार उत्तर परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी दिले. ते म्हणाले, पाकिस्तानकडून संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठाचा चुकीचा वापर केला जातो. सिंधू जल कराराच्या सुरुवातीलाच म्हटले आहे की, चांगला हेतू आणि मैत्री यामुळे हा करार केला जात आहे. परंतु पाकिस्तान भारताविरोधात दहशतवादी कारवाया करत असेल तर या कराराची अंमलबजावणी कशी होणार? या कराराचे प्रामाणिकपणे पालन करणे गरजेचे होते. मात्र, पाकिस्तानने दहशतवादी कारवाया आणि दहशतवाद्यांना पाठिंबा देऊन हा करार धोक्यात आणला. कीर्ति वर्धन सिंह यांनी म्हटले की, संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर पाकिस्तानकडून नेहमी अनावश्यक मुद्दे आणले जात आहे. या व्यासपीठाचा त्या मुद्यांशी संबंध नसताना ते उपस्थित केले जात आहे. पाकिस्तानच्या या प्रयत्नांचा आम्ही कठोर शब्दांत निषेध करतो.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com